# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे - ४११ ००४

**कृतिपत्रिकेद्‌वारे होणाऱ्या मूल्यमापनासाठी आवश्यक अध्ययन-अध्यापनासंदर्भात सूचना -**

१. कृतिपत्रिकेद्वारे विदयार्थ्यांचे मूल्यमापन जरी केले जाणार असले तरीही प्रचलित पाठयपुस्तकात कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

२. पाठयपुस्तकातील स्वाध्याय हे अध्ययनासाठी आवश्यक असेच आहेत. परंतु, ते कृतिद्‌वारे मांडून कसोटी घेता येणे शक्य आहे.

३. पाठांचे अध्यापन करत असताना ते कृतिद्‌वारे होईल, याकडे शिक्षकांनी लक्ष देणे आवश्यक आहे.

४. ज्ञानरचनावादाच्या विविध तत्वांना समोर ठेवून ते अध्यापनात व अध्ययनात जास्तीत जास्त प्रमाणात येईल, हे पाहणे आवश्यक आहे.

५. कृतिपुस्तिका लवकरच उपलब्ध करून दिली जाईल. त्याचा उपयोग पाठनिहाय विविध कृतींमधून सराव देण्यासाठी करण्यात यावा.

६. प्रतिसाद म्हणून विदयार्थ्यांकडून जे अपेक्षित आहे, त्याची चर्चा विदयार्थ्यांबरोबर जरूर करावी.

**कृतिपत्रिकेच्या प्राश्निकांसाठीच्या सूचना -**

कृतिपत्रिका तयार करणे हे उत्तरपत्रिका तयार करण्यापेक्षा आव्हानात्मक आहे. 'पारंपरिक प्रश्नपद्‌धतीऐवजी कृतिद्‌वारे होणारे मूल्यमापन' या बदलाची नोंद घेणे आवश्यक आहे. मूल्यमापनामध्ये परीक्षा ही कंटाळवाणी, नीरस वाटू नये, ती आनंददायी, ताण-तणावरहित असायला हवी, याची जाणीव ठेवावी. तसेच, मूल्यमापन हे प्रत्यक्ष जीवनाशी निगडीत असावे. त्यात ज्ञानरचनावादातील तत्त्वांचा उपयोग करून कृतिपत्रिका तयार करावी. प्रश्नार्थक वाक्यांच्या साहाय्याने करावयाच्या मूल्यमापनाबरोबर कृतिंमधून विद्‌यार्थ्यांच्या संपादणूकीचे परीक्षण होणे अपेक्षित आहे. विद्‌यार्थ्यांनी स्मरणशक्तीच्या कसोटीला प्राधान्य देणाऱ्या प्रश्नांऐवजी समस्या निराकरण करणाऱ्या कृती करणे अपेक्षित आहे.

**प्राश्निकांनी कृतिपत्रिका तयार करताना पुढील सूचनांची जाणीव ठेवावी -**

**(अ) कृतिपत्रिका तयार करण्यापूर्वी -**

१. भाषा अध्ययनाच्या उदि्दष्टांची स्पष्ट जाणीव व पुरेसा अभ्यास असणे गरजेचे आहे.

२. कौशल्यनिहाय कृती निश्चित करण्यासाठी भिन्न प्रकारच्या कृती करणे गरजेचे आहे. ज्यामुळे एकाच प्रकारच्या कृतीची पुनरावृत्ती कृतिपत्रिकेत होणार नाही.

३. प्रत्येक कृतीमधून कोणते कौशल्य तपासले जाणार आहे, हे निश्चित करणे आवश्यक आहे.

४. आकलनाचे कौशल्य तपासण्यासाठीचे परिच्छेद निवडण्यासाठी काळजी घ्यावी. परिच्छेद आराखडयातील नमूद केलेल्या शब्दमर्यादेत असावे. असा परिच्छेद निवडावा की जो अर्थाच्या दृष्टीने परिपूर्ण असेल. पाठयपुस्तकातील परिच्छेदामध्ये अनावश्यक बदल करण्यात येऊ नयेत. जास्त मोठे किंवा जास्त छोटे परिच्छेद असू नयेत. परिच्छेदातील संदर्भ पूर्ण असावा. एकाच धडयातील दोन परिच्छेद असू नयेत. विविध प्रकारच्या कृती काढता येतील, असेच परिच्छेद निवडावेत.

५. कृतीसाठी आवश्यक असणारे विविध आकार, सकारण, सहेतुक असावेत. विनाकारण विविध भौमितिक आकृत्या वापरू नयेत.

६. कृती करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सूचना स्पष्ट असाव्यात. त्यातून कोणत्याही स्वरूपाचा संभ्रम निर्माण होऊ नये. विद्यार्थ्यांकडून उत्तरलेखनाची अपेक्षा नीट व्यक्त केली जावी.

७. संपूर्ण कृतिपत्रिकेत एका प्रकारची कृती एकदाच यावी. पुनरावृत्ती टाळावी.

८. उपप्रश्ननिहाय गुण आणि अपेक्षित उत्तर यांची संख्या जुळणारी असावी. एका उपप्रश्नास १/२ पेक्षा कमी गुण देता येणे शक्य नसते, याची जाणीव ठेवावी.

९. कृतींची मांडणी आकर्षक असावी. पण ती सकारण असावी.

१०. उपयोजित लेखनासाठीची कृती तयार करत असताना विद्यार्थ्यांना लेखनासाठी मुद्दे मिळतील असे पहावे.

११. उपयोजित लेखनासाठीच्या विषयामध्ये कोणत्याही समाज, धर्म, जाती, भाषा, लिंग इत्यादी भेदावर पूर्वग्रहदूषित असे नसावे. समाजात तेढ निर्माण करणारे आक्षेपार्ह असे विषय असू नयेत.

१२. कृती तयार करताना त्याचा संपूर्ण संदर्भ निवडलेल्या परिच्छेदावरच आधारित असावा. पाठातील इतर भागावर आधारित संदर्भ कृतीत नसावा. तो अभिव्यक्तीच्या कृतीमध्ये येऊ शकतो.

**(ब)** १. कृतिपत्रिका तयार करत असतानाच अपेक्षित उत्तरपत्रिका पण तयार करावी.

२. कोणत्या मुद्दयास किती गुण अपेक्षित आहेत, हे स्पष्ट करावे.

*******